पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८
नगरसचिव विभाग
क्रमांक : नस/९/कावि/६६५/०९
दिनांक : १४/८/२००९

प्रति,

मा.................................
सदस्य, विधी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

विषय : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा दिनांक २१/०८/२००९ रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक २१/०८/२००९ रोजी दुपारी २:००वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत : १) सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८

मा. विधी समिती

<u>कार्यपत्रिका क्रमांक : ४</u>

दिनांक : २१/०८/२००९ वेळ : दुपारी २ :०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार, दिनांक २१/०८/२००९ रोजी दुपारी २ :०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

दिनांक ७.८.२००९ व ११.८.२००९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ३) सभावृत्तांत कायम करणे.

विषय क्रमांक : १) पदोन्नती निवड समितीची शिफारस विचारात घेता १.डॉ.श्री.पोळ रमेश बाबुराव - खुला २.डॉ.श्री.कांबळे रमेश श्रीपती खुला(अनु.जाती)३.डॉ.श्रीमती.यादव कमल अजित (खुला),४.डॉ.श्री.इनामदार तृप्ती रत्नाकर (खुला) ५.डॉ.श्री.जेरे ध्रुव अनंत (खुला) ६.डॉ.श्री.मार्कंडेय प्रशांत अनंत (खुला) या वैद्यकिय अधिका-यांना जेष्ठ वैद्यकिय अधिकारी पदावर र.रु.१०००० - १५२०० या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नतीने नेमणुक देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
(दि.२१.०८.२००९ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक : २) बुध्द विहार से.नं.२२ निगडी या ठिकाणी पत्राशेड प्रश्नी महेश गायकवाड यांनी आत्महत्या केली आहे रिपब्लीकन सेना या संघटनेने या प्रश्नी त्यांचे पत्नीस व मुलींना आर्थिक मदत मिळणेकामी मागणी केली आहे. मा.पोलिस उपआयुक्त परिमंडळ ३) यांचे समक्ष झालेल्या बैठकीमधील चर्चेनुसार या प्रश्नी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होउ नये म्हणुन संघटनेस दिवंगत महेश गायकवाड यांच्या कुटुंबियांना मदत देणेबाबत नियमानुसार कार्यवाही करणेत येईल व त्या अनुषंगाने मा.महापालिका सभेपुढे विधिवत प्रस्ताव पाठवणेत

येईल असे कळविणेत आलेले आहे. महापालिकेकडे अशा प्रकरणी मदत देणेबाबत नियम/उपविधी नाहीत तसेच तरतुद ही नाही, म्हणुन याकामी धोरणात्मक निर्णय घेणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
(दि.२१.०८.२००९ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक : ३) मा.झोपडपट्टी सुधार,गृहनिर्माण आणि समाजकल्याण समिति सभा दिनांक २०.७.२००९, ठराव क्रमांक ६ नुसार , पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील झोनिपु (स्था) विभागात श्री.डी.एन.गट्टुवार उपअभियंता पदावर काम करित आहेत. ते अनुसूचित जमाती या प्रवर्गातील आहेत तसेच त्यांची या पदावर तीन वर्षे सेवा पुर्ण झालेली आहे. कार्यकारी अभियंता संवर्गातील अनुसूचित जमातीचे पद बरीच वर्षे रिक्त आहे व या संवर्गात श्री.गट्टुवार हे सर्वात जेष्ठ आहेत. श्री गट्टुवार यांचा झोनिपु (स्था) विभागातील १५ वर्षापेक्षा जास्त अनुभव आहे. या अनुभवाचा या विभागातील कामांचे नियोजन व कार्यवाहीसाठी मोठा उपयोग होणार आहे. सदर संवर्गातील उमेदवारांवर अन्याय होउ नये यासाठी श्री.गट्टुवार यांना निम्नस्तरावरील पदाच्या अनुभवाची अट शिथील करुन कार्यकारी अभियंता पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
(दि.२१.०८.२००९ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८
नगरसचिव विभाग
क्रमांक : नस/९/कावि/६६५/०९
दिनांक : १४/८ /२००९ चे लगत

टिप : प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.